दिनांक 14/02/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.142

विषय – विटा शहर हागणदारीमुक्त म्हणून ODF++ प्रमाणपत्र उपलब्ध करून घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 14/02/2022 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षणमध्ये मागील 5 वर्षामध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेली असून स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्येही विटा नगपरिषदेने सहभाग घेतलेला आहे. त्याअनुषंगाने विटा शहर ODF++ म्हणून प्रशासकीय ठराव नं. 63 दि.13/10/2022 अन्वये मंजूरी देणेत आली होती. त्यावर शहरातील नागरीकांच्या सुचना व हरकती दैनिक पुढारी,सांगली या वर्तमानपत्रामध्ये मागविण्यात आल्या होत्या. विटा शहर ODF++ करणेबाबत शहरातील संस्था व नागरीक यांनी हरकती दिलेल्या नाहीत. विटा शहर ODF++ दर्जा मिळणेसाठी स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस मंजूरी देत आहे, याकामी येणा-या प्रसिध्दी व इतर अनुषंगीक खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 14/02/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.143

विषय – विटा शहर कचरामुक्त म्हणून 5 स्टार मानांकन प्रमाणपत्र उपलब्ध करून घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 14/02/2022 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

विटा नगपरिषदेने स्वच्छ सर्वेक्षणमध्ये मागील 5 वर्षामध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेली असून स्वच्छ सर्वेक्षण 2023 मध्येही विटा नगपरिषदेने सहभाग घेतलेला आहे. त्याअनुषंगाने विटा शहर 5 तारांकित मानांकन म्हणून प्रशासकीय ठराव नं. 62 दि.13/10/2022 अन्वये मंजूरी देणेत आली होती. त्यावर शहरातील नागरीकांच्या सुचना व हरकती दैनिक बंधुता, सांगली या वर्तमानपत्रामध्ये मागविण्यात आल्या होत्या. विटा शहर 5 स्टार मानांकन करणेबाबत शहरातील संस्था व नागरीक यांनी हरकती दिलेल्या नाहीत. विटा शहर 5 स्टार मानांकन दर्जा मिळणेसाठी स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस मंजूरी देत आहे,याकामी येणा-या प्रसिध्दी व इतर अनुषंगीक खर्चास मंजूरी देत आहे.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा